2 5 JUL 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पूरग्रस्तांना शिवाजी विद्यापीठाचा आधार

## पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ; परिसरातील गवत चाऱ्यासाठी पुरविणार

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील महापूर परिस्थितीमध्ये शिवाजी विद्यापीठाने महानगरपालिका यंत्रणेच्या माध्यमातून शहर व परिसराला पिण्याचे पाणी पुरवण्याची जबाबदारी उचलली आहे. त्याचप्रमाणे जनावरांच्या चाऱ्यासाठी परिसरातील गवत पुरविण्याचाही निर्णय घेतला आहे.

> सन २०१९च्या पूरस्थितीमध्ये कोल्हापूर शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळीही विद्यापीठाने महापालिकेच्या यंत्रणेच्या माध्यमातून शहराला पिण्याचे पाणी पुरविले होते. हा अनुभव लक्षात घेऊन यंदाही विद्यापीठाने आपली यंत्रणा तयार ठेवली होती. त्यानुसार शहराला पिण्याचे पाणी पुरविण्यास सुरू केले आहे. त्याचप्रमाणे या काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर असतो. त्यासाठीही विद्यापीठाने आपल्या परिसरातील गवत पुरविण्याची तयारी केली आहे.
>
> -डॉ. डी. टी. शिर्के,कुलगुरु

अतिवृष्टीमुळे शुक्रवारी शहराला पाणीपुरवठा करणारे महानगरपालिकेचे सर्व जलशुद्धीकरण प्रकल्प पाण्याखाली गेल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी पुरविण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न उद्भवल्याचे लक्षात येताच विद्यापीठ प्रशासनाने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून आपल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे शहराला पाणी पुरविण्याची तयारी केली. त्यानुसार प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याशी कुलगुरू डॉ. शिर्के यांची चर्चा होऊन शनिवारी सकाळपासून महानगरपालिकेच्या टँकरच्या माध्यमातून विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रातून शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला.

त्याचप्रमाणे शहरात ठिकठिकाणी पाळीव पशुधनासाठी चारा छावण्या निर्माण करण्यात आल्या आहेत. पुरामुळे या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्या प्राण्यांच्या चाऱ्यासाठी विद्यापीठाच्या परिसरातून गवत पुरविण्याचा निर्णयही प्रशासनाने घेतला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JUL 2021
पुढारी

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सरसावले शिवाजी विद्यापीठ

## शहरवासीयांना पाणी; जनावरांना चारा पुरविणार

**कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे शहर व परिसरात निर्माण झालेल्या महापूर परिस्थितीमध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने महानगरपालिका यंत्रणेच्या माध्यमातून शहर व परिसराला पिण्याचे पाणी पुरवण्याची जबाबदारी उचलली आहे. त्याचप्रमाणे जनावरांच्या चाऱ्यासाठी परिसरातील गवत पुरविण्याचाही निर्णय घेतला आहे.

कोल्हापूर शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे शहराला पाणीपुरवठा करणारे महानगरपालिकेचे सर्व जलशुद्धीकरण प्रकल्प पाण्याखाली गेल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी पुरविण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न उद्भवल्याचे लक्षात येताच कालपासून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे शहराला पाणी पुरविण्याची तयारी केली.

त्यानुसार महानगरपालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याशी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची चर्चा होऊन शनिवारी सकाळपासून महानगरपालिकेच्या टँकरच्या माध्यमातून विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रातून शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. पुरामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्या प्राण्यांच्या चाऱ्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातून गवत पुरविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JUL 2021
तरुण भारत

# विद्यापीठाकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात

**कोल्हापूर :** मुसळधार पावसामुळे शहराला महापुराचा विळखा असल्याने शहराला पाणीपुरवठा करणारी उपसा केंद्र पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे गेल्या दोन दिवसापासून शहराला पाणीपुरवठा झालेला नाही. या आस्मानी संकटात दरवेळीप्रमाणे शिवाजी विद्यापीठाने मदतीचा हात पुढे केला आहे. महानगरपालिका यंत्रणेच्या माध्यमातून शहर व परिसराला पिण्याचे पाणी पुरवले जाणार आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार जनावरांच्या चाऱ्यासाठी परिसरातील गवतही पुरवण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला आहे. अतिवृष्टीमुळे गेल्या दोन दिवसापासून शहराचा पाणीपुरवठा खंडीत करण्यात आला आहे. महापुरामुळे महानगरपालिकेचे सर्व जलशुद्धीकरण प्रकल्प पाण्याखाली गेल्याने नागरिकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे शहराला पाणी पुरवठा करण्यात आला. महानगरपालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याशी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी चर्चा करून हा निर्णय घेतला.